<u>**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**</u>

**प्रेस नोट दि.२८/०८/२०१९**

<u>**दि.२७/०८/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**</u>

<u>**भाग-१ ते ५ चे गुन्हे**</u>

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ७३५/१९,भादविक ३०७,३४ |
| **फिर्यादी** | रेहन रफीक महाब्ज,वय-२२,रा.कोंढवा-खुर्द,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०८/२०१९ रोजी १५/३० वा. शालीमार सोसायटी पाठीमागील रोडवर कोंढवा-खुर्द |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे मित्र शहनवाज व अरबाज याचेसह मोटार सायकलवरुन घरी जात असताना,य़ातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे गाडीला आडवे आले. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना 'तुला गाडी पाहुन चालवता येत नाही का' असे म्हणाल्याचे कारणावरुन,चिडुन जावुन फिर्यादीस जीवे मारण्याचे उद्देशाने त्यांचे मानेवर ब्लेडने मारुन गंभीर जखमी केले आहे. तसेच शहनवाज व अरबाज यास देखील ब्लेडने मारुन जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.शिंदे ९९२२८५५४७० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५८४/१९,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.७(१) |
| **फिर्यादी** | कुंदन शिंदे, पोलीस नाईक, भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे शहर |
| **आरोपी** | १)करण सुरेश शिंदे,वय २३ वर्षे,रा.कात्रज,पुणे २)मितेश सुरेश शिंदे,वय-२९ वर्षे,रा.सदर ३) विशाल मोहन बोराने,वय-२५ वर्षे,रा.वर्वे,ता.भोर,जि.पुणे ४)अमित सुनिल भोरडे,वय-२१ वर्षे, रा.दत्तनगर,कात्रज,पुणे ५)शंभुराजे जालिंदर कोंडे,वय-२१ वर्षे,रा.वर्वे,भोर,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०८/२०१९ रोजी २०/४० वा. कात्रज घाटात निसर्ग हॉटेलचे जवळ,कात्रज,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे तीन लोखंडी कोयते, दोन पुडे मिरची पावडर,नायलॉन दोरी तसेच १.मोटार सायकल नं.एम.एच.१२/ई.एस./८७०४ २.मोटार सायकल नं.एम.एच.१२/एच.के.४२३० अशा दोन मोटार सायकली, एक मोबाईल असा एकुण ५५,७१०/- रू किचा ऐवज बेकायदेशीर रित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथी दारांची जमवाजमव करून,दरोडा टकाण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,कात्रज घाटात निसर्ग हॉटेलच्या जवळ, कात्रज पुणे येथे स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना अ.क्र.१ ते ५ हे मिळुन आले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १९९/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | समाधान रांजणकर,वय-२३ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०८/२०१९ रोजी ०५/५५ वा. मिर्च मसाला हॉटेल समोरील रोडवर कर्वे रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी जॉगिंग करीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून पाठीमागुन त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे गळयातील ९०००/- रु किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.गोरे ९९७५०७४६२ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६१०/१९,भादविक ३९२,आर्म ॲक्ट ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)१३५, मोटार वाहन कायदा कलम १२८ प्रमाणे |
| **फिर्यादी** | धीरजकुमार बिहाणी,वय-२४ वर्ष,रा.वाघोली,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील तीन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०८/२०१९ रोजी पहाटे ०३/४५ वा.संगमवाडी पार्किंग नं.३ चे जवळील रोडचे डावे बाजुस संगमवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे स्कुटीवरून वाघोली येथे जात असताना,संगमवाडी पार्किंग नं.३ चे जवळील रोडचे डावे बाजुस लघुशंकेकरीता थांबले असता,त्यांचे समोरून तीन अनोळखी इसमांनी मोटार सायकलवरून येवुन,त्यापैकी मागे बसलेल्या इसमाने त्याचे हातातील कोयता फिर्यादी यांचे पोटाला लावून,त्यांचे हातातील मोबाईल फोन,खिशातील पैशाचे पाकीटा मधील १०,५०० रुपये रोख,हातातील घडयाळ,गाडीची चावी व आधारकार्ड,गाडीचे आरसी बुक,स्मार्ट कार्ड,एटीएम कार्ड असा एकुण १८,६००/- रुपये किंमतीचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून घेवुन चोरून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.पी.भांगे ८८०५३३३०३३ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे २६१/१९,भादविक ४६५,४६८,४७१,४२० |
| **फिर्यादी** | डॉ.गणपत मोरे, शिक्षणाधिकारी माध्यमिक,जुनी जिल्हा परिषद,पुणे |
| **आरोपी** | एक महिला,सहशिक्षक, एक माध्यमिक विदयालय,ता.हवेली,जि.पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०७/२०१४ पासुन ते आजपर्यंत मा.शिक्षणाधिकारी,माध्यमिक,जुनी जिल्हा परिषद,पुणे |
| **तपशिल** | यातील हवेली,जि.पुणे येथील एका माध्यमिक विदयालयातील नमुद महिला,सहशिक्षका यांनी स्वतःच्या सहशिक्षक पदाच्या वैयक्तीक मान्यतेची प्रत ही तात्कालीन शिक्षणाधिकारी, माध्यमिक जिल्हा परिषद,पुणे यांचे स्वाक्षरीची सादर करण्यात आली होती. परंतु ते शिक्षणाधिकारी म्हणुन दि.२७/८/२०१४ रोजी उपस्थित झाले असताना,शिक्षण अधिकारी यांचे सहीचा बनावट मान्यता आदेश तयार केला. तसेच त्यांनी विना दिनांक व विना जावक क्रमांकाचे शिक्षणसेवक पदाच्या वैयक्तीक मान्यतेचा फिर्यादी यांचे सहीचा बनावट मान्यता ओदश तयार करुन,फिर्यादी व शासनाची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.भोसले ९८५०९११३११ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे २४४/१९,भादविक ४२०,३२३,५०६ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४१ वर्ष,रा.कोरेगाव पार्क,पुणे |
| **आरोपी** | नितिन सुरेंद्र भंडारी,वय-३६,रा.अतुर पार्क,बि.नं.१८/१०२,कोरेगाव पार्क,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१२/२०१७ रोजीपासुन ते दि.२५/०८/२०१९ रोजीपर्यन्त फिर्यादी यांचे राहाते घरी कोरेगाव पार्क,पुणे व बेंगलोर येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया घडस्फोटीत असून,त्यांनी लग्नासाठी www.tinder.com या वेबसाईटवर लग्नासाठी नाव नोंदविले होते. यातील नमुद इसम नितीन भंडारी याने सदर वेबसाईटव्दारे फिर्यादी यांचेशी लग्न करण्यासाठी संपर्क साधुन,नमुद कालावधी व ठिकाणी फिर्यादी यांचेबरोबर लग्नाचे आमिष दाखवून त्यांचेबरोबर जवळील साधुन,फिर्यादीचे वानवडी शाखा,पुणे,कोरेगाव पार्क शाखा,पुणे येथील बँकेचे खात्यांमधुन वेळोवेळी एकुण ८,६६,४००/- रुपये स्वतःचे बँकेच्या खात्यावर वर्ग करुन घेऊन,फिर्यादी यांना त्यांची रक्कम परत न करता फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निखिल पवार ९८२२७९१६९९ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७४९/१९,भादविक ४२०,५०४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२८ वर्षे,रा.जनवाडी,गोखलेनगर,पुणे |
| **आरोपी** | एक अज्ञात मोबाईलधारक व्यक्ती (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११ मे २०१९ रोजी सकाळी ११/०० ते २०/०० वा.चे दरम्यान ओएलएक्स मोबाईल अॅपवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी मोबाईलवरील ओएलएक्स या अॅपवर ऑनलाईन दुचाकी गाडी शोधत असताना,अज्ञात मोबाईलधारक व्यक्तीने फिर्यादी यांना फोन करुन,त्याचे आर्मीचे कॅन्टीनचे कार्ड व्हाट्सअॅपवर दाखवुन,त्याचेजवळ अॅक्टीवा गाडी असल्याचे सांगुन,त्याची स्वतःची ओळख लपवुन,त्याचे मोबाईल पेटीएम अॅपचे नंबरवर ऑनलाईन ३१,०००/- रुपये भरण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांना अॅक्टीवा गाडी न देता,त्यांना शिवीगाळ करुन फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा तक्रारी अर्जावरून दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे), व्हि.ए.गलांडे ९०११०३७७६२ |

८

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ८६१/१९,भादविक ३८४,३८५,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५९ वर्षे,रा.एनआयबीएम रोड,पुणे |
| **आरोपी** | माथाडी कामगार व त्यांचा अध्यक्ष असे एकुण सहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०८/२०१९ रोजी सकाळी १०/०० वा.ते १३/३० वा.चे दरम्यान हनीवेल ऑटोमेशन इंडिया लिमिटेड,हडपसर,पुणे येथील कंपनीचे मटेरीयल गेट समोरील रोडवर |
| **तपशिल** | यातील माथाडी कामगार व त्यांचा अध्यक्ष यांनी फिर्यादी यांचे कंपनीचे मटेरीयल गेटवर के. एन.एम.ट्रान्सलॉजिस्टीक या ट्रान्सपोर्ट कंपनीचा ट्रक हा कंपनीचे इलेकट्रॉनिक इक्युपमेन्टं माल घेवुन आला असता,सदर इसमांनी ट्रक मधील कोणताही माल खाली न करता,आम्ही माथाडी कामगार आहोत ट्रक खाली करायचा असल्यास,त्यासाठी ट्रक चालक व फिर्यादी यांना १० हजार रुपयेची खंडणीची मागणी केली. तसेच फिर्यादी यांना धक्का-बुक्की व शिवीगाळ करुन,सदरचे पैसे न दिल्यास,ट्रक खाली करु न देण्याची व पाहुन घेण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.एम.लोणारे ९९२३४४४९९८ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**